SHIVAJI COLLEGE HINGOLI

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed
Multidisciplinary International Research Journal

April - 2023

( CDVI) 406- B

## THE CONTRIBUTION OF SAVITRIBAI PHULE MAHATMA PHULE, RAJARSHI SHAHU MAHARAJ & DR. B. R. AMBEDKAR TOWARDS NATION BUILDING"

## (TNB-2023)



Chief - Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive-Editor
Prof (Dr.). S. G. Talnikar
Principal
Toshniwal Arts, Commerce
& Science College, Sengaon
Tq: Sengaon, Dist. Hingoli

Editor
Dr.R.V.Navgankar
Department of Sociology.
Toshniwal Arts, Commerce
& Science College, Sengaon
Tq: Sengaon, Dist. Hingoli.

Co-Editor
Dr.D.S.Dharwadkar
Head Department of Sociology
Toshniwal Arts, Commerce
& Science College, Sengaon
Tq: Sengaon, Dist. Hingoli.

B.Aadhar

**This Journal is indexed in :**

- **Scientific Journal Impact Factor (SJIF)**
- **Cosmos Impact Factor (CIF)**
- **International Impact Factor Services (IIFS)**

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed


**Multidisciplinary International Research Journal**

April - 2023

( CDVI) 406- B

## THE CONTRIBUTION OF SAVITRIBAI PHULE MAHATMA PHULE, RAJARSHI SHAHU MAHARAJ & DR. B. R. AMBEDKAR TOWARDS NATION BUILDING"

## (TNB-2023)



**Chief - Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive-Editor**
Prof (Dr.). S. G. Talnikar
Principal
Toshniwal Arts, Commerce
& Science College, Sengaon
Tq: Sengaon, Dist. Hingoli

**Editor**
Dr.R.V.Navgankar
Department of Sociology.
Toshniwal Arts, Commerce
& Science College, Sengaon
Tq: Sengaon, Dist. Hingoli.

**Co-Editor**
Dr.D.S.Dharwadkar
Head Department of Sociology.
Toshniwal Arts, Commerce
& Science College, Sengaon
Tq: Sengaon, Dist. Hingoli.

B.Aadhar

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

Impact Factor - (SJIF) - 8.632 ISSN - 2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

## April - 2023

**( CDVI ) 406- B**

**THE CONTRIBUTION OF SAVITRIBAI PHULE MAHATMA PHULE, RAJARSHI SHAHU MAHARAJ & DR. B. R. AMBEDKAR TOWARDS NATION BUILDING"**

**(TNB-2023)**

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Prof (Dr.). S. G. Talnikar**
Executive-Editor
Principal,
Toshniwal Arts, Commerce & Science College, Sengaon Tq: Sengaon, Dist. Hingoli

**Dr.R.V.Navgankar**
Editor
Department of Sociology.
Toshniwal Arts, Commerce & Science College, Sengaon Tq: Sengaon, Dist. Hingoli

**Dr.D.S.Dharwadkar**
Co-Editor
Head Department of Sociology
Toshniwal Arts, Commerce & Science College, Sengaon Tq: Sengaon, Dist. Hingoli

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

## INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Role of Women in Water Management: Case Study of Hingoli, Maharashtra India **Dr. Udaykumar L Sahu, , Mr. Arvind P. Naik** | 1 |
| 2 | Dr. Babasaheb ambedkar & water policy of india **Prof. Sanjay Shamrao Waghmare** | 5 |
| 3 | Work of Chhatrapati Shahu Maharaj towards upliftment of Marginal Group of Population in pre-Independent India **Suryakant D. Somwanshi, Dr. Deepak S. Dharwadkar** | 8 |
| 4 | National Education Policy-2020 and Languages: Social Perspective **Mr. Vijay Shriram Kolhe** | 12 |
| 5 | Reflection of Dalit Consciousness in Literature and Culture **Kirankumar Shyamrao Jadhav** | 15 |
| 6 | मुशर्रफ़ आलम ज़ौक़ी के साहित्य में अभिव्यक्त सामाजिक परिवेश **डॉ. सुनील एस. कांबळे** | 20 |
| 7 | भारतीय समाज और हिन्दीसाहित्य **प्रा. घन प्रमोद किशनराव** | 23 |
| 8 | छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणीक कार्याचा अभ्यास. **प्रा. डॉ.मलवाडे व्ही. ए.** | 26 |
| 9 | महिला सक्षमीकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान **प्रा.डॉ.विद्या खंडारे** | 30 |
| 10 | राजर्षी शाहू महाराज : एक ऐतिहासिक विश्लेषण **प्रा. डॉ. क्षिरसागर बी. एस.** | 34 |
| 11 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार **प्रा. डॉ. दहिकांबळे एस.डी** | 41 |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राष्ट्रवादाविषयी भूमिका **प्रा.डॉ. अंभोरे अशोक गंगाराम** | 45 |
| 13 | स्त्रियांचे उद्धारकर्ते : महात्मा जोतीराव फुले **प्रा. लटपटे एन. के.** | 48 |
| 14 | महात्मा फुले यांचे कृषी सुधारणा विषयक विचार **प्रा.डॉ. सुखदेव पी. बलखंडे** | 52 |
| 15 | महात्मा फुले यांचे भारतीय समाजक्रांतीतील योगदान **डॉ.संदीप गोरे** | 55 |
| 16 | ग्रामीण कादंबरी साहित्यातील समाज जीवन **प्रा डॉ श्रीराम मारोतराव कऱ्हाळे** | 61 |
| 17 | डॉ आंबेडकर आणि राष्ट्रीय एकात्मता **प्रा वाघमारे के. एच.** | 66 |
| 19 | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणीक कार्ये **प्रा. डॉ. पांडूरंग राजाराम मुठे** | 70 |
| 19 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे समाजपरिवर्तन विषयक विचार **प्रा. डॉ. विठ्ठल भिमराव मातकर** | 74 |
| 20 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीत योगदान | 79 |


SHIVAJI COLLEGE HINGOLI
PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

ISSN : 2278-9308
April, 2023

# ग्रामीण कादंबरी साहित्यातील समाज जीवन

प्रा डॉ श्रीराम मारोतराव कऱ्हाळे
मराठी विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय हिंगोली. मो.9890579227

ग्रामीण जीवनात शिक्षणाचा प्रवेश झाला.ग्रामीण लोक शिकू लागले.आपल्या भाव भावना शब्द माध्यमातून न मांडता त्या लिपीबद्दल पद्धतीने मांडू लागले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 1960 नंतर मराठी साहित्यात वेगवेगळे साहित्य प्रवाह उदयाला आले. त्यामध्ये ग्रामीण साहित्य प्रवाह हा मुख्य प्रवाह मानला जातो.
निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या समुदायातील कलावंत आपल्या साहित्यातून ग्रामीण जीवनातील सुख,दु:ख, घटना प्रसंग, समाज जीवन धार्मिक जीवन सांस्कृतिक जीवन रेखाटू लागले.

साहित्याच्या निर्मात्या हा समाजाचा घटक असल्याने त्यांच्यावर समाज संस्कार उमटलेले असतात. साहित्यात त्या काळातील समाजवास्तव व तेथील राजकीय सामाजिक सांस्कृतिक परिस्थिती आपोआपच त्यांच्या लेखनात प्रकट होत असते याबाबत लालजी पेंडसे म्हणतात, ,"समाजाच्या विचारसरणीचे प्रतिबिंब तत्कालीन साहित्यात पडत असते म्हणून हे सामाजिक प्रतिबिंबासारखे असते. या प्रतिबिंबावरूनच सामाजिक संस्कृतीचे महत्त्व होत असते."१

समाजाचे प्रतिबिंब हे साहित्यातून उमटत असते. ग्रामीण साहित्याने देखील काळानुसार समाजानुसार परंपरेनुसार समाजजीवनाचा स्वीकार केलेला आहे . " जे साहित्य शहरी जीवनाशी निगडीत नसते तर जे साहित्य निसर्गाशी निगडीत राहून निसर्गाच्या सानिध्यात राहून जीवन जगणाऱ्या मानवी समूहाच्या जीवनातील सुख दु:खाचा आलेख मांडून मानवी समूहाच्या आचार - विचार केंद्रस्थानी ठेवून, समाज जीवन, धार्मिक जीवन, सांस्कृतिक जीवन , राजकीय दर्शन,भौगोलिक परिसर प्रादेशिक भाषेतून मांडला जातो ते साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य असे म्हणता येईल." असे मला वाटते.

शेतीशी निगडित समाज,ग्रामीण भाषा बोलणारा समाज, ग्रामीण भूभागावर व निसर्ग सानिध्यात वास्तव्य करणारा समाज, लोकजीवनाशी बांधील असलेल्या समाज म्हणजे ग्रामीण समाज असे म्हणतात येईल.ग्रामीण साहित्याबाबत नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "ग्रामीण जीवनातून फुलणारे ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ग्रामीण साहित्य होय."२ ही ग्रामीण साहित्याची केलेली व्याख्या यथार्थ वाटते.
साहित्याची निर्मिती समाजा शिवाय होणे शक्य नसते साहित्याचा निर्माता हा देखील समाजाचे अपत्य असते. साहित्याचा आस्वाद घेणारा वाचक आणि साहित्याचा आशय हा समाजाशी घनिष्ठ नाते ठेवून असतो. साहित्याच्या निर्मात्या संदर्भाने वासुदेव मुलाटे म्हणतात, "सर्वसामान्य माणसाप्रमाणेच साहित्याची निर्मिती करणारा, संवेदनशील मनाचा, सर्जनशील साहित्यिक हाही त्या त्या काळात घडणाऱ्या घटनांचा-प्रसंगाचा साक्षीदार असतो. एवढेच नव्हे, तर एकूण समाजाच्याच स्थिती-गतीचा, अधोगतीचा, उत्क्रांतीचा तो साक्षीदार असतो. कधी-कधी तर तो स्वत:च काळाच्या लाटेवर हेलकावणाऱ्या जहाजातील एक प्रवासी असतो. अशावेळी तो प्रत्यक्षानुभव घेणे आणि तो साहित्यातून नोंदविणे अशी दोन्ही कामे करीत असतो."३

साहित्यिक हा काळानुसार बदलाचा साक्षीदार असतो. कादंबरी वाङ्मयाचा विचार करताना पहिली सामाजिक कादंबरी म्हणून 'यमुना पर्यटन' कादंबरीचा विचार केला जातो. १८५६ मध्ये विधवा विवाहाचा कायदा पास झाल्याने त्याचे पडसाद साहित्यावर पडले. त्यानंतर ही कादंबरी अस्तित्वात आली आहे. समाजातून साहित्याची निर्मिती होत असल्याने साहित्य समाजापासून दूर जाऊ शकत नाही. 'बळीचा पाटील' ही कृष्णराव भालेकर यांनी


SHIVAJI COLLEGE HINGOLI
PRINCIPAL

कादंबरी सामाजिक अंगाने पाहता येते, बळीबा पाटील हा पंच्याण्णव वर्षाचा दिसतो. त्या अनुषंगाने तेथील सामाजिकता आपल्या दृष्टिक्षेपात येते. रामतनय यांची 'मोहित्यांची मंजुळा' ही कादंबरी ग्रामीण जीवनातील समाजजीवन प्रकट करते. र. वा. दिघे यांची 'पाणकळा' सराई , किंवा ग. ल. ठोकळ यांची 'गावगुंड' यातून समाज जीवनाचा एक व्यापक पट आपल्या डोळ्यांसमोर येत असतो. बा. भ. बोरकर यांच्या 'भावीण' कादंबरीतून एक उपेक्षित सामाजिक स्तर पुढे येतो. श्री. ना. पेंडसे यांची 'लव्हाळी', 'गारंबीचा बापू' यातून स्वप्नरंजनाबरोबरच समाज ही डोकावतो. धग, पाचोळा या सारख्या ग्रामीण कादंबऱ्यांतून आपल्या कुटुंबासाठी प्रतिकूल परिस्थितीमध्ये संघर्ष करणाऱ्या सोशिक व जिद्दी स्त्रियां दिसून येतात, यातून एक वेगळे समाज वास्तव आपल्या पुढे साहित्यातून येते. कृषिसंस्कृतीवरती औद्योगिक संस्कृतीचे आक्रमण होते आणि 'गोतावळा', 'नटरंग', 'पाचोळा' यांसारख्या ग्रामीण समाजवास्तव चित्रित करणाऱ्या कादंबऱ्या निर्माण झालेल्या दिसतात. समाजातील उपेक्षित स्तर व त्यांचे समाजजीवन जवळ-जवळ सर्वच कादंबऱ्यांमधून प्रकट होताना दिसते. हमीद दलवाई यांच्या 'इंधन' या कादंबरीतून हिंदू-मुस्लिम संघर्ष प्रकट होऊन एक सामाजिकता पुढे येते. तर ना. धों. महानोर यांच्या 'गांधारी' या ग्रामीण कादंबरीतून रझाकारांचा अत्याचार प्रकट होत असताना समाजाला एक वेगळे व्यक्तिमत्त्व प्राप्त होताना दिसते.

रां.रं.बोराडे यांच्या 'पाचोळा' कादंबरीतून शहरीकरणामुळे नष्ट होऊ पाहणाऱ्या व्यवसायिक म्हणून गंगाराम शिंपी डोळ्यासमोर उभा राहतो.ग्रामीण समाजात जसा आहे. तसा तो खुनशी स्वभावाचा आहे. गंगाराम ला उध्वस्त करण्यासाठी तो गावात नवीन मशीन घेऊन येतो. त्यामुळे त्याला गावातील कामे फारशी मिळत नाही कुटुंबावर उपासमारीचे संकट येते. या कादंबरीतील नायिका पारबतीची डोळस दृष्टी आहे. त्या त्या परिस्थितीमध्ये सुखी राहून कोणाशी संघर्ष करण्याचे तिच्या ध्यानी-मनी नसते, परंतु यातील गरड हा ग्रामीण लोकमानसातील दुष्ट प्रवृतीचे प्रतिनिधित्व करतो आहे. हे लोकमानस नियतीला देवाला दोष देते आहे. आपल्याला कष्ट करावे लागते त्याच्यामागे एक नियती आहे. आपल्या मनाने कितीही ठरविले तरी त्याला नशीब साथ देत नाही, अशी असहाय्यता या ठिकाणी दिसून येते. याबाबत 'पाचोळा' या कादंबरीतील पारवती आपले मत व्यक्त करताना म्हणते, "आपुनं मोप म्हणतो माजं असं व्हावं आन् माजं तसे व्हावं; पर वरचा बाबा करायचं तेच करतो. आता हेच बघा की, भाना शिकंल म्हणून किती वाटत व्हतं आमाला, पर कसला शिकतो। आठव्या दिशी आला वापस की घरला।" ४ परिस्थितीशी झगडण्याची जिद्द या दरिद्री परिस्थितीने दिलेली आहे. गंगारामच्या माध्यमातून हट्टी माणस भानाच्या माध्यमातून निडर माणस व गरडाच्या माध्यमातून दुष्ट प्रवृत्तीची माणूस समाजात वावरत असतात.

कादंबरी साहित्यातील स्त्रीच्या संदर्भात डॉ. सुधीर रसाळ म्हणतात, "आपल्या संसारावर, मुलाबाळांवर आणि नवऱ्यावर प्रेम करणारी, त्यांच्या व्यथा-वेदनांनी व्याकूळ होणारी त्यांच्या सुखासमाधानासाठी कष्ट उपसणारी, खेड्यातील अशिक्षित, व्यवहारचतुर आणि नितळ मनाची स्त्री तिच्या कथनातून सतत प्रकट होत राहते."५ यातून एक सर्वांना समजून घेणारी नायिका पुढे येते. जी सर्वांवर प्रेम करत जगत असली, तरी दुसऱ्याचे वैर तिला सहन होत नाही. हे समाज जीवन दिसून येते.

बाबाराव मुसळे यांच्या 'पखाल' कादंबरीतून सामाजिक चित्रण येते .यंत्रयुगामुळे खेड्यातील उद्योगधंदे नष्ट झाले. त्यामुळे अनेक कामगार बेकार झाले. बलुतेदारी नष्ट झाली आणि त्याचा परिणाम गावगाड्याची घडी विस्कटण्यावर झाला. सामान्य माणूस काम न राहिल्याने उद्ध्वस्त झाला. तर नवीन योजनांमुळे जुने कारागीर बेकार झाले. या गोष्टींची परिणती म्हणून कुटुंबांचे स्थलांतर शहराकडे होऊ लागले. पण काही जुन्या विचारांची माणसे जन्मलेल्या गावातच मृत्युची वाट पहात बसली म्हणजे परिवर्तन न स्वीकारल्याने वाळ्याला आलेल्या दयनीय अवस्थेच्या समाजाचे चित्रण कादंबरीत आले आहे.



PRINCIPAL
Shivaji College, HING

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) – 8.632, Issue NO, 406 (CDVI) B
ISSN : 2278-9308 April, 2023

कादंबरीचा नायक पुंजा हा जुन्या विचारांचा आहे. म्हणूनच तो पखालीने पाणी भरून पोट भरण्यात धन्यता मानणारा आहे. मात्र त्याचाच मुलगा दगडू परिवर्तनवादी विचारांचा आहे. म्हणूनच तो पोट भरण्यासाठी मुंबईला जाण्याचा विचार करतो. शिवाय पुंजाची पत्नी मुलगा आणि नवरा यांच्यामध्ये दबून गेली आहे. कारण पती परमेश्वर असल्याने त्यालाच साथ दिली पाहिजे ही पतिव्रतेची समाजातील मानसिकता तिच्या ठिकाणी कार्यरत आहे. तर अपत्यप्रेमाणे आंधळे झालेले मातेचे मनही विव्हळ होतांना दिसते. म्हणजे एका प्रकारे कोळी समाजातील कुटुंबाच्या हाल अपेष्टांचे चित्रण तर कादंबरीत येतेच. त्याचबरोबर पुंजाच्या हाकेने जागे होणाऱ्या गावाचे आणि नळयोजना आल्यानंतर पुंजाला डावलून नळावरच पाणी भरण्यात आनंद मानणाऱ्या गावकऱ्यांच्या परिवर्तनवादी सामाजिकतेचाही प्रत्यय कादंबरीतून येतो.

'वारूळ' या कादंबरीत विशेषतः मातंग समाजाचे चित्रण केले आहे. मातंगांची चळवळ, तिला बळकटी देण्यासाठी झटणारे परभूचे कुटुंब, याच चळवळीचा स्वतःच्या स्वार्थासाठी उपयोग करून घेणारा याच समाजातील एक गट, समाजासाठी काम करण्याचे सोंग करून समाजाला राजकीय स्वार्थाचा बळी बनवणारी समाजातील पुढारी मंडळी, या समाजाला मतदानासाठी जवळ करणारी उच्चवर्णीय मंडळी आणि स्वार्थ साधल्यानंतर दूर करणारी व त्यांच्यातच फूट पाडून चळवळीचा सत्यानाश करणारी धूर्त राजकारणी अशाप्रकारचे अनेकविध सामाजिक चित्रणाचे घटक या कादंबरीतून जाणवतात.

समाज म्हणजे वारूळ आहे. ते एकाने तयार होत नाही. त्यासाठी अनेकांचे योगदान असावे लागते ही समाजाची समूह भावना कादंबरीतून बाबाराव मुसळे यांनी अतिशय प्रभावीपणे चित्रित केली आहे. ह्या कादंबरीत मातंग समाजाच्या वास्तव चित्रणाबरोबरच परिवर्तनाचा आलेखही मांडलेला दिसतो. 'वारूळ' मध्ये जवळपास पन्नास वर्षांचा कालखंड आहे. कादंबरीच्या पहिल्या भागात येसाजी तर दुसऱ्या भागात परिवर्तनाच्या चळवळीत सक्रिय कार्यकर्ता म्हणून काम करणाऱ्या परभूचे चित्रण आहे. येसाजीचा कालखंड हा स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचा कालखंड असून बौद्धांची कामं मांगांनी आनंदानं स्वीकारल्याचा आहे. आपणही गावापेक्षा कमी नाही अशा गुर्मीत वावरणाऱ्या बौद्धांच्या वागण्याने मातंग समाजही विथरून वागतांना दिसतो. गाव आणि मातंग यांच्यात समन्वयवादी भूमिका निभावून एकत्रित समाजाला नांदवायला लावणारा येसाजी व नंतर परभू समाजोद्धारक अशाच वृत्तीचे आहेत. अशा प्रकारे सामाजिक चित्रण या कादंबरीत आले आहे.

'बावटळ' ही व्यंकटेश माडगूळकर यांची कादंबरी गांधी वधानंतर झालेल्या होरपळीची बावटळ समाजात कशी आली याचे चित्रण करते. त्यात ब्राम्हण समाजाच्या घरांची जाळपोळ, लुटालूट आणि त्यातून मानवी मनाची झालेली तगमग येथे स्पष्ट दिसते. येथे धर्म, जात या गोष्टी ग्रामीणतेत भिनलेल्या आढळून येतात. जाती-धर्मांच्या नावाने सत्ताकारण, राजकारण करणारे काही लोक व प्रवृत्ती ग्रामीणतेतही आढळून येतात. तर एक जात दुसऱ्या जातीला पाण्यात पाहते. कधी कधी माणुसकीचाही प्रत्यय येऊन जातो. यातील महादा म्हणतो, "गावच्या लोकाशी अक्कल नाही. अरे, तुमच्यासारख्या मूर्ती कशाला येतील ह्या गावात ? आँ? चला माझ्या घरी. कोण काय करतंय ते बघू. तुमच्या केसाला धक्का तर माझ्या प्राणाला धक्का. मग तिथेही पिशव्या उचलून महादाबरोबर चालू लागलो."६ यामध्ये समाजातील चांगल्या आणि वाईट प्रवृत्तीच्या लोकांचे दर्शन होते.

बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दूध दे' या कादंबरीतून समाजाचे चित्रण केले आहे. शेतकऱ्यांच्या जीवनाची दुर्दशा आणि त्यांचा समाजातील इतर ढोंगी पुढाऱ्यांनी करून घेतलेला उपयोग या कादंबरीतून पदोपदी जाणवतो. या कादंबरीतील सामाजिक चित्रणाविषयी 'अस्मितादर्श'मधून देश दुधलकर म्हणतात, "प्रस्तुत कादंबरी हृदयाचा ठाव घेते. ती लेखकाच्या सच्च्या अनुभवामुळे. ग्रामीण व्यवस्था, तिथली माणसं, चालीरीती, स्वभाव, सण, उत्सव, वागणे, बोलणं

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

ISSN : 2278-9308
April, 2023

ह्या सर्व गोष्टी बाबारावांनी इतक्या जिवंत उभ्या केल्या आहेत की, त्या वाचतांना वाचक क्षणभर स्वतःला विसरून ग्रामीण वास्तवाच्या तळाशी रममाण होतो."

ह्या कादंबरीतील समाज सामान्य आणि शेतकरी वर्गातील आहे. त्यामुळे वास्तवात शेतकऱ्याच्या व सामान्य माणसाच्या जीवनाची ओढाताण कादंबरीतील पात्रांच्या रूपाने समोर येते. ज्ञानबा हा आपली मुलगी लग्न होऊन सासरी सुखाने नांदावी म्हणून धडपडणारा आहे. त्याची ही धडपड म्हणजे सुखाचा शोध घेण्यासाठी केलेली केविलवाणी धडपड होय. मात्र सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचारी मानसिकतेमुळे या सामान्य ज्ञानबाची झालेली फसगत आणि त्यामुळे खचून गेलेला ज्ञानबा व त्याचा दुःखी शेवट हेच समाजवास्तव ही कादंबरी चित्रित करते. एकाच वेळी शेतकऱ्यांचे फरफटलेले जीवन, सरकारी अधिकाऱ्यांची ढोंगी प्रवृत्ती आणि भ्रष्टाचाराने पोखरलेले प्रशासन व दुसऱ्याच्या आयत्या धनावर डोळा ठेवून मुलीच्या बापाकडून हुंडा उकळणारी ऐतखाऊ समाजाची वृत्ती अशा प्रकारच्या समाजातील विविध वृत्ती -प्रवृत्तीवर ही कादंबरी प्रकाश टाकते.

'गोतावळा' या कादंबरीतील नारबा हा ग्रामीण समाजाचा एक प्रतिनिधी आहे. त्याने कृषिसंस्कृतीशी जवळचे नाते निर्माण केलेले दिसते. राम सोनावडे यांच्या शेतावर शेतमजूर म्हणून काम करणारा नारबा आपला गोतावळा गुरा-ढोरांमध्ये, पशु-पक्ष्यांमध्ये शोधताना दिसतो. माणसांपेक्षा जनावर बरे असे त्याची अवस्था येथे दिसून येते. नारबा हा निसर्गाशी एकरूप होताना धार्मिकतेकडेही झुकलेला आहे. येथील म्हसोबा शेताचे राखण करतो, ही त्याची श्रद्धा आहे. जन्मभर शेतावर कष्ट करणारा नारबा मालक आपले लग्न करून देईल अशी खोटी आशा बाळगतो. अशा पद्धतीने ग्रामीण समाजातील जीवन जगणारी माणसं असतात.

'धग' या कादंबरीतील कौतिक व महादेव ग्रामीण लोकमानसाच्या विविध प्रवृत्तींचेही प्रतिनिधित्व करतात. सहनशील, नियतीवाद कौतिक आणि आळशी, तापट असा महादेव येथे येतो. ग्रामीण जीवनात जगत असताना दुसऱ्या धर्मातील सकीना कौतिकला आधार देते. मुस्लिम असून देवळात भजनाला जाणारा कासम दिसतो. यातून देवाला एकच धर्म असतो तो म्हणजे मानवता हा सत्याविष्कार येथे दिसतो. कोणत्याही धर्माचा सण-उत्सव असला की ग्रामीण समाज उत्साहाने साजरा करतो. मोहरम सणाच्या दिवशी स्वतः हिंदू असून आपल्या मुलाला मोहरमच्या सणामध्ये सहभागी करणारी कौतिक ग्रामीण समाजात वावरताना दिसते.

**निष्कर्ष :-**

ग्रामीण साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध आहे.

ग्रामीण साहित्य हे ग्रामीण समाजातील चालीरीती रूढी -परंपरा चे दर्शन वाचकांना घडवित असते. ग्रामीण साहित्य हे ग्रामीण संस्कृतीचे, कृषी संस्कृतीचे दर्शन घडवित असते.

ग्रामीण कादंबरी साहित्यातून ग्रामीण समाजातील राजकारण अलंत दिसून येते. 'पाचोळा' कादंबरीत गरदाचे जुने कपडे शिवून दिले नाहीत म्हणून त्या गावात दुसरा कारागीर आणून ठेवला जातो.

पाणकळा कादंबरीत ग्रामीण समाजात असलेली माणुसकी महादाच्या रूपाने दिसून येते.

ग्रामीण समाजातील पशु प्राण्यावर प्रेम करणारा समाज नारबाच्या रूपाने आपल्याला दिसून येतो.

ग्रामीण भागातील मातंग समाजाचे चित्रण बाबाराव मुसळे यांच्या 'वारूळ' या कादंबरीतून येताना दिसते

रूढी परंपरेला चिकटून असलेल्या समाजाचे चित्रण 'पखाल' या कादंबरीतून पुंजाच्या रूपाने दिसून येतो.

**संदर्भ टिपा**

१) 'साहित्य आणि समाज',- पेंडसे लालजी, न्यू मनोहर प्रिंटिंग प्रेस, मुंबई. १९३५ पृ.१४.
२) 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध': कोतापल्ले नागनाथ, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे,१९८५,पृ.७
३) 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास',: (संपादक) नलगे चंद्रकुमार, सुरेश एजन्सी,१९९६,पृ.१

ISSN : 2278-9308
April, 2023

४) 'पाचोळा' : रा. रं. बोराडे, मौज प्रकाशन, १९७१ पृ.१९.

५) 'प्रतिष्ठान' ,: रसाळ सुधीर, नोव्हेंबर/डिसेंबर १९९९,पृ.३७

६) 'बावटळ' : व्यंकटेश माडगूळकर, उत्कर्ष प्रकाशन, १९८५. पृ.४१.

७) 'हाल्या हाल्या दुधू दे',: बाबाराव मुसळे, बजाज पब्लिकेशन १९८५

८) 'गोतावळा',: आनंद यादव, मौज प्रकाशन,१९७१

९) 'धग', : उध्दव शेळके, पॉप्युलर प्रकाशन,१९६०

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI